## राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, कोंकण खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १८ (१) अन्वये झालेली तक्रार

### तक्रार क्रमांक : १४८०/२०२२

**तक्रारकर्ता,** श्री.महेश तुकाराम मढवी,
रा.घर क्रमांक २५५/०६, सेक्टर ०५,
सानपाडा गाव, नवी मुंबई ४००७०५.

विरुध्द

विद्यमान जन माहिती अधिकारी तथा अति.कार्यकारी अभियंता, पामबीच उपविभाग, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग पामबीच, सेक्टर ९, डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान जवळ, पोस्ट ऑफीस समोर, नेरुळ, नवी मुंबई ४०० ७०६.

तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा. कार्यकारी अभियंता, पामबीच उपविभाग, महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग पामबीच, सेक्टर ९, डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान जवळ, पोस्ट ऑफीस समोर, नेरुळ, नवी मुंबई ४०० ७०६.

**तक्रार सुनावणीचा दिनांक : ४/१२/२०२५**

| माहितीचा अर्ज दाखल केल्याचा दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज प्राप्त दिनांक | प्रथम अपिल आदेश प्राप्त दिनांक |
|---|---|---|---|
| १४/६/२०२२ | ---- | ५/८/२०२२ | २९/८/२०२२ |

तक्रारकर्ता यांनी दि.१५/११/२०२२ रोजीच्या अर्जान्वये " माहिती दिली नाही " असे कारण नमूद करुन कलम १८(१) अन्वये तक्रार अर्ज दाखल केला आहे. सदर तक्रार अर्जावर आज दिनांक ४/१२/२०२५ रोजी सुनावणी घेण्यात आली.

सदर सुनावणीस उभयपक्ष अनुपस्थित आहेत. (कार्यालयाद्वारे नोटीस पाठविलेबाबतचे ट्रॅकिंग रिपोर्ट सादर करण्यात आले असून, ते नस्तीसोबत अभिलेखावर ठेवण्यात आलेले आहेत)

तक्रारकर्ता यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे खालीलप्राणे माहिती मागितली आहे.

" ग्राहक क्रमांक ०००२९००४३३२८ हा मीटर मिळणेकरीता ग्राहकाने सादर केलेला अर्ज याची पूर्ण संचिका याची प्रमाणित प्रती देण्यात याव्यात "

तद्‌नंतर तक्रारकर्ता यांनी प्रथम अपिलीय प्राधिकारी यांचेकडे कलम १९ (१) अन्वये प्रथम अपील दाखल केले.

तक्रारकर्ता यांनी दाखल केलेल्या प्रथम अपीलावर तत्कालीन प्रथम अपीलीय प्राधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि.२९/८/२०२२ रोजी, "*जुने उपविभागीय कार्यालय व ज्या ठिकाणी रेकॉर्ड ठेवलेले आहेत तेथे जास्त मनुष्यबळ लावून कागदपत्र तपसावेत व अपिलार्थी यांना मागणी केलेली माहिती २० दिवसांत अपिलार्थी यांना उपलब्ध करून द्यावी.*" असा निर्णय दिलेला आहे.

सुनावणीची सूचना प्राप्त होऊन देखील उभयपक्ष सुनावणीस अनुपस्थित आहेत.
उपलब्ध कागदपत्रांवरून दिसून येते की, प्रथम अपील आदेशानुसार तत्कालिन जन माहिती अधिकारी यांनी अद्याप तक्रारर्तास माहिती दिलेली नाही.

यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे.

Comp-3

# आदेश

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी **तक्रारकर्ता यांना माहिती १५ दिवसात जलद टपालाने नि:शुल्क पुरवावी.** जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर तक्रारकर्ता यांना १५ दिवसांत पाठवावे.

२. तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.ए.एन.काळे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, पामबीच उपविभाग, महावितरण यांनी तक्रारकर्ता यांच्या दिनांक १४/६/२०२२ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहीत मुदतीत तसेच प्रथम अपील आदेशानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत २० (१) अन्वये माहिती पुरविण्यास झालेल्या विलंबाच्या प्रतिदिन रु.२५०/- (अधिकतम रु.२५,०००/-) इतक्या शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा त्यांनी पुढील सुनावणीच्या वेळी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

३. प्रस्तुत प्रकरणाची पुढील सुनावणी दि.१३/१/२०२६ रोजी दुपारी २.०० वाजता होईल.

कोंकण भवन,
बेलापूर, नवी मुंबई : ४०० ६१४.
दिनांक : ४ डिसेंबर, २०२५ .

**(शेखर चन्ने)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**कोंकण खंडपीठ**

**प्रत आवश्यक कार्यवाहीस्तव रवाना**

तत्कालिन जन माहिती अधिकारी श्री.ए.एन.काळे, अतिरिक्त कार्यकारी अभियंता, पामबीच उपविभाग, महावितरण **– यांना प्रत** -
--विद्यमान जन माहिती अधिकारी तथा
अति.कार्यकारी अभियंता, पामबीच उपविभाग,
महाराष्ट्र राज्य वीज वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग पामबीच,
सेक्टर ९, डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान जवळ,
पोस्ट ऑफीस समोर, नेरुळ, नवी मुंबई ४०० ७०६.**यांचेमार्फत रवाना.** (विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी सदर आदेशाची प्रत तात्काळ तत्कालिन जन माहिती अधिकारी यांना बजावून पोहोच आयोगास सादर करावी.)